

# पहिले पान

संपादक : डॉ. रेखा जगनाळे

दि. ०१ ऑक्टोंबर ते दि. ३० ऑक्टोंबर २०१८




सौ. अनिषा दुरगकर
टंकलेखन

**सुविचार:—**

स्वतःच्या अज्ञानाची जाणीव असणे, हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे.

—स्वामी विवेकानंद

**Institution has developed its vision and mission.**
**The vision of the Institution is “Determined for excellence in Social Work Education”.**
**The Mission of the Institution is**
**We at BPNISW shall work continuously to achieve-**

1. **To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential**
3 **To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality**
4 **Providing Social Work Education for both personal and social transformation**
5 **Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.**

**Core values:**

- **An unwavering faith in Human dignity An abiding faith in duty towards other individuals and society**

**The vision and mission of the institution is communicated to the students, teachers, staff and other stakeholders through its publication in the prospectus, institutional website, advertisement in newspapers, Orientation programme and through Alumni Association of the institute. The vision and mission of the institution is in tune with the National Education Policy, 1986. The nature of social work is such that there occurs holistic development of personality of the students. The social work syllabus is reviewed and updated periodically. In addition to this, the institution offers value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students. bridge courses; value added courses, innovative courses, and modular courses for the total development of personality. These courses definitely enhance the employability of the students.**

## महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन संपन्नः—

दि. 15/10/2018 रोजी ईश्वर देशमुख मेमोरियल ग्रंथालयातर्फे वाचन प्रेरणा दिन म्हणून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर, डॉ. दिलीप बारहाते, डॉ. रेखा जगनाळे डॉ. पौर्णिमा गंथडे उपस्थित होते.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी थोडक्यात आपली मत मांडली. या निमित्ताने ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होता याप्रसंगी मोठ्या संख्येत विद्यार्थी , प्राध्यापकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी केले.



## राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी :—



महाविद्यालयात 2 आक्टोंबर 2018 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाला बहादूर शास्त्री यांच्या जन्मदिनानिमित्ताने 'स्वच्छता रॅली चे आयोजन करण्यात आले., रा.से.यो. विभाग, सेंटर फार सस्टेनेबल डेव्हलपमेंट आणि कुष्ठरोग विभाग शासकीय आरोग्य सेवा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कुष्ठरोग निर्मूलन, भारत स्वच्छता अभियान, **स्वच्छता हीच सेवा** या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी यशवंत बागडे, जोनल अधिकारी श्री. जिनेश कलोदे, सेंटर फार सस्टेनेबल डेव्हलपमेंट संस्थेच्या प्रमुख लिना बुधे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर, डॉ. दिलीप बारहाते, डॉ. अनंत अरडे, डॉ. नंदा पांगुळ, डॉ. सिमा लोबो, डॉ. अनिल सरगर, प्रा. सुनिल कोडापे, डॉ. पौर्णिमा गंथडे, रा.से.यो अधिकारी डॉ. विलास घोडे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी महात्मा गांधी आणि डॉ. लाल बहादुर शास्त्री यांचा प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गांधीजी आणि शास्त्रीजी यांच्या जीवनावर व कार्यावर आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सोबतच स्वच्छते विषयी पथनाट्य सादर केले. या रॅलीमण्ये महाविद्यालयातील 250 विषर्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदशैन प्राध्यानक डॉ. विलास घोडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशसवितेकरिता विद्यार्थ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथि साजरीः—

महाविद्यालयातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारप्रसार केंद्रात राष्ट्रसंतांचे पुण्यतिथि साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर यांनी राष्ट्रसंतांचा प्रतिमेला पुष्पहार घालून आणि वंदन करून पुण्यतिथि साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील विचारप्रसार केंद्राच्या प्रमुख डॉ. नंदा पांगुळ, डॉ. दिलीप बारहाते, डॉ. अनिल सरगर, डॉ. सिमा लोबो, डॉ. विलास घोड, डॉ. रेखा जगनाळे आणि डॉ. पौर्णिमा गंथडे उपस्थित होत्या.





## मराठी विषयाचे स्वतंत्र अभ्यासक्रम :—

दि. 03/10/2018 रोजी तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयात आयोजित माठी विषयाचे स्वतंत्र अभ्यासक्रम **'काळाची गरज'** चर्चासत्रात डॉ. रेखा जगनाळे यांचा सकिगय सहभाग. आजवर मराठी विषयाचा अभ्यासक्रम हा बी.ए.चा अभ्यासक्रम होता परंतू तो आज बदलण्यात यावा म्हणून मराठीच्या समाजकार्य प्राध्यापकानी या कार्यक्रमात स्वतंत्र अभ्यासकाची आखणी केली.

## अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र :—

दि. 01 ऑक्टोंबर रोजी अभ्यासक्रमावर डॉ. अभय बंग व राणी बंग, मेधा पाटक या दोन विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले. अभय बंग राणी बंग आधारित विषयावरिल शोधनिंबंध अक्षय जुगनाके, प्रियंका आळे, पंकज वानोले या सादर आणि विद्यार्थ्यांनी केले तर मेधा पाटकर याविषयावर शोधनिबंध पायल वानखेडे आणि कालिदास` वाडमे या विद्यार्थ्यांनी केले. या चर्चाचत्रामध्ये अध्यक्ष्याची भूमिका श्री. श्रीकांत नारनवरे यांनी निभवली सादर तर चर्चासत्रात प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. रेखा जगनाळे होत्या.

निखिल वैद्य या विद्यार्थ्याने कार्यक्रमाचे सूत्रसंचानल केले तर आभार प्रदर्शन निखिल वानखेडे यांनी केले. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्याना निबंध लिहिण्याची व निबंध सादर करण्याची कला अवगत झाली. त्याचबरोबर दोन्ही विषयांचा अभ्यास झाला.



## महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन पथनाट्य स्पर्धा :–

महाविद्यालयाच्या सुवर्ण जयंती महोत्सवी वर्षनिमित्ताने महाविद्यालय, रा.से.यो.पथक आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊनटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रस्ता सुरक्षा/रस्ता अनधात प्रतिबंध या विषयावरिल पथनाट्य स्पर्धा मंगळवार दि. 09/10/018 रोजी ईश्वर देशमुख कॅम्पस स्वातंत्र्य सेनानी सभागृहामधे आयोजित केली. स्वर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर, रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊनटाऊनच्या अध्यक्षा श्रीमती मिनल डेहाडराय आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊनटाऊनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊनटाऊनच्या अध्यक्षा श्रीमती मिनल डेहाडराय यांनी रस्ता सुरक्षा विषयी मार्गदर्शन केले व स्पर्धाकांना शुभेच्छा दिले.

स्पर्धेच्या समारोह पुरस्कार सोहळयाला श्री. वज़ीर शेख ,वरिष्ठ पोलिस अधिकारी, अजनी पोलिस स्टेशन, प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर, श्रीमती मिनल डेहाडराय, परिक्षक डॉ. हिरालाल मेश्राम, डॉ. अल्का बडगे, श्री. अन्नाजी गुंडलवार उपस्थित होते. या स्पर्धेला लाभलेल्या परिक्षकांनी स्पर्धेचा निकाल जाहिर केला यात प्रथम पुरस्कार शासकीय विज्ञान महाविद्यालय नागपूर, द्वितीय पुरस्कार, श्री. भैयाजी पांढरीपांडे नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर आणि तृतीय पुरस्कार व्ही.एम. व्ही. कॉलेज, वर्धमान नगर, नागपूर या महाविद्यालयांनी पटकविले.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धेकरिता रा. से. यो. अधिकारी डॉ. विलास घोडे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रेखा जगनाळे यांनी समन्वयकाची भूमिका उत्कृष्टपणे पार पाडली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. आभा ठाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी डॉ. विलास घोडे व डॉ. रेखा जगनाळे यांनी केले. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.



## प्रोफेसर्स कॉलनी ते हेमलकसा :जीवनप्रवास :–

महाविद्यालयातील ग्रंथालयाचा उपक्रम ईश्वर देशमुख ज्ञानपीठ व प्रोफेसर्स कॉलनी मित्र मंडळ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम स्व. प्राचार्य श्री. ल. उपाख्य भैयाजी पांढरीपांडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ रविवार **दि. 28/10/2018** रोजी प्रोफेसर्स कॉलनी ते हेमलकसा या विषयावर डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांचे व्याख्यान ईश्वर देशमुख कॅम्पसमध्ये आयोजित केले होते. आमटे दाम्पत्यांचा प्रोफेसर्स कॉलनी ते हेमूलकसा असा प्रवास शब्दांकित करित सभागृहाला मंत्रमुग्ध केले. या व्याख्यानातून समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना समाजकार्याचे विशिष्ट धडे मिळाले त्यामुळे समाजकार्य प्रशिक्षण घेताना समाजकार्यातील विशिष्ट प्रेरणादायी विभूति निश्चितच प्रेरित करित असतात आणि याची अनुभूति या कार्यकमातून विद्यार्थ्यांना आली असावी..

या कार्यक्रमाला प्रोफेसर्स कॉलनी मित्र मंडळ, महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

